Google Maps **Mhalsakant Chowk**




▨ : काम करण्याचे ठिकाण
(हनुमान चौक ते समृद्धी बिल्डींग)

▭ (पिवळा) : पर्यायी मार्ग वाहतुकीसाठी



Scanned with CamScanner

Google Maps Mhalsakant Chowk




▨ काम करण्याचे ठिकाण (हनुमान चौक ते मयुर समृद्धी बिल्डींग

▭ पर्यायी वाहतुक मार्ग.

Scanned with CamScanner

## प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/नियोजन/२३८८/२०२१ पिंपरी चिंचवड शहर दिनांक-२५/०३/२०२१

निगडी वाहतूक विभाग हद्दीतील म्हाळसाकांत चौक ते खंडोबामाळ चौकादरम्यान रस्त्याचे कॉंक्रीटकरण करण्यासाठी काम करण्याचे नियोजित आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०१९६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप आयुक्त, परि २, अति. कार्य.वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

### निगडी वाहतूक विभाग

१. म्हाळसाकांत चौकाकडून खंडोबामाळकडे जाणारा रोड वाहतूकीसाठी बंद करण्यात आले आहे.
   - पर्यायी मार्ग :- म्हाळसाकांत चौकाकडुन खंडोबामाळ कडे जाणारी वाहतुक हनुमान मंदिर आकुर्डी याठिकाणापासुन डावीकडे वळवुन विठ्ठल मंदिर, लक्ष्मीनारायण ज्वेलर्स किंवा मयुर समृध्दी फेज वन इमारत खंडोबामाळ चौक व इच्छित स्थळी

२. खंडोबामाळ चौक ते म्हाळसाकांत चौकाकडे जाण्यासाठी प्रवेश बंद
   - पर्यायी मार्ग :- खंडोबामाळ कडून म्हाळसाकांत चौकाकडे जाणारी वाहतुक लक्ष्मीनारायण ज्वेलर्स किंवा मयुर समृध्दी फेज वन इमारत या ठिकाणापासून उजवीकडे वळून विठ्ठल मंदिर, हनुमान मंदिर, म्हाळसाकांत चौक व इच्छित स्थळी

   वरील प्रमाणे दि.२७/०३/२०२१ पासुन ६० दिवसाकरीता वाहतुक वळविणेत येत आहे.

तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

आनंद भोईटे
पोलीस उप-आयुक्त,
परि.२,अतिरिक्त कार्यभार
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
   २/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक निगडी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

४) कार्यकारी अभियंता, अ क्षेत्रीय कार्यालय,
   २/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner